महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

बहादरपूर (जि.जळगाव) उपकेंद्रातून नवीन ५ एम.व्ही.ए. चा अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्याबाबत

(१) ३५३१७ (१२-०१-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहादरपूर (जि.जळगाव) उपकेंद्र अंतर्गत असलेल्या चार फिडर पैकी ११ के.व्ही. भोलाणे व ११ के.व्ही. मोंढाळे या फिडरवर भार जास्त असल्यामुळे परिसरातील शेतक-यांच्या कृषी पंपाना योग्य कालावधीत निर्धारित क्षमतेत वीज पुरवठा होत नसल्याच्या अनेक तक्रारी शेतक-यांकडून संबधित अधिका-यांकडे करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी ३३/११ के.व्ही. बहादरपूर उपकेंद्रातून नवीन ५ एम.व्ही.ए. चा अतिरिक्त पॉवर ट्रान्सफार्मर मंजूर करण्याची मागणी म.रा.वि.वि.कं.लि. चे अधिक्षक अभियंता, जळगावं, कार्यकारी अभियंता, पाचोरा आणि उपकार्यकारी अभियंता, पारोळा, जि.जळगांव यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय हे अंशत: खरे आहे.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांना अग्रेषित केलेले पत्र, मुख्य अभियंता-जळगाव परिमंडळ कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने बहादरपूर, जि.जळगाव उपकेंद्रामध्ये ५ एम. व्ही. ए. क्षमतेचा अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर स्थापित करण्याकरिता कार्यादेश दिला असून, सदरचे काम प्रगतीपथावर आहे. बहादरपूर उपकेंद्रामध्ये अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर अस्थापित झाल्यानंतर परिसरातील कृषीपंप ग्राहकांना योग्य दाबाने वीज पुरवठा होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेमध्ये ओबीसींचा समावेश करण्याबाबत

(२) ३५३३९ (१२-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दि.१४ एप्रिल,२०२१ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी विशेष वीज जोडणी मोहिम सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेमध्ये ओबीसी प्रवर्गाचा समावेश करण्यात न आल्याने खेड्यापाड्यात ओबीसी समसाजातील कुटूंबाना वीज जोडणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेमध्ये ओबीसींचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महावितरणच्या विविध योजनेअंतर्गत ओबीसी सहित इतर प्रवर्गास वीज जोडणी देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

म्हैसाळ (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) ६वा टप्पा ही योजना प्रलंबित असल्याबाबत

(३) ३५५४० (१०-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हैसाळ (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) ६वा टप्पा ही योजना अद्यापही प्रलंबित असल्यामुळे तालुक्यातील १३ दुष्काळी गावांचा पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची योजना मागील ९ वर्षापासून निधी अभावी प्रलंबित असल्याने उक्त योजना त्वरीत पूर्ण होण्याच्या निधी उपलब्ध करुन देवून १३ गावांचा पाणी प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती दृष्टीने शासनाने कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाने इलेक्ट्रिक वाहनांना करिता नवीन
चार्जिंग स्टेशन्स उभारण्याचा निर्णय घेतल्याबाबत

(४) ३५५६२ (१२-०१-२०२२). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्याकरिता २५०० नवीन चार्जिंग स्टेशन्स उभारण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिल्या टप्प्यात सोलापूर, मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती या शहरांना जोडणाऱ्या महामार्गांवर ही स्टेशन्स उभारण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त महामार्गांवर चार्जिंग स्टेशन्ससाठी जागा शोधण्याकरिता शासनाने महावितरणला पत्र पाठविले असून चार्जिंग स्टेशन्स उभारणी करण्याकरिता शासनाने महावितरण कंपनीच्या स्टेट नोडल एजन्सीची नेमणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार महावितरणने आत्तापर्यंत कोणत्या महामार्गांवर व किती चार्जिंग स्टेशन्ससाठी जागा निश्चित केल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) होय हे खरे आहे. महाराष्ट्र राज्य वाहन धोरण २०२१ नुसार सन २०२५ पर्यंत सार्वजनिक आणि निम-सार्वजनिक चार्जिंग पायाभुत सुविधांसाठी शहरनिहाय एकूण २३७५ लक्षांक आहे. तसेच सदर धोरणानुसार सार्वजनिक व निमसार्वजनिक चार्जिंग स्टेशन्ससाठी १५००० मंदगती चार्जर व ५०० मध्यम वेगवान चार्जरला आर्थिक प्रोत्साहन देण्यात आली आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.
महाराष्ट्र राज्य वाहन धोरण २०२१ नुसार सन २०२५ पर्यंत खालील चार महामार्ग/एक्सप्रेस वे हे पूर्णत: इलेक्ट्रिक वाहनाच्या चार्जिंग सुविधानी सज्ज करण्याचे उद्दिष्ट आहे.
१. हिंदुहदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग (मुंबई-नागपूर)
२ यशंवतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग (मुंबई-पुणे)
३. मुंबई-नाशिक
४. नाशिक-पुणे
तसेच महामार्गाच्या दोन्ही बाजूला प्रत्येकी २५ कि.मी. अंतरावर सार्वजनिक चार्जिंग स्टेशन्स उभारण्याचे नियोजित आहे.
(३) अंशत: खरे आहे.
चार्जिंग पायाभुत सुविधा पुरविण्याकरिता महावितरण कंपनीस राज्य नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. राज्य नोडल एजन्सी म्हणून एकात्मिक चार्जिंग पायाभुत सुविधासाठी आराखडा तयार करण्याची जबाबदारी महावितरणला देण्यात आली आहे.
(४) महावितरण कंपनीने स्वत: च्या जागेमध्ये ठाणे (५), नवी मुंबई (२), पूणे (४), आणि नागपूर (१) अशी एकूण १२ चार्जिंग स्टेशन सुरु केली आहेत व राज्यात सद्यस्थितीत ४९७ इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन सुरु आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील उपकेंद्रावर सिंगल फेजींग वीज पुरवठा करण्याबाबत

(५) ३५६७६ (१२-०१-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील उप केंद्राव्दारे शेतक-यासाठी सिंगलफेज वीज पुरवठा करण्यात आल्याने शेतकऱ्यांना रात्री शेतीकामे करणे सोपे झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्युत विभागाच्या अनागोंदी कारभारामुळे उपरोक्त उप केंद्रातून सुरु करण्यात आलेला सिंगल फेजींग वीज पुरवठा अचानक बंद केल्या असल्याने शेतकऱ्यांनमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त उपकेंद्रातील सिंगल फेजींग वीज पुरवठा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) खामगांव तालुक्यामधील खामगांव ग्रामीण उपविभागाअंतर्गत असलेल्या ७ सिंगल फेजींग वीज वाहिन्यांव्दारे सद्यस्थितीत वीज पुरवठा सुरळीतपणे सुरु आहे. परिणामी सिंगल फेजींग व AG SDT वीज वाहिन्यांबाबत कोणतीही तक्रार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे चिंचपूर व पिंप्री (ता.खामगाव, जि.बुलढाणा)कोरडे या गावांची वीजेची जोडणी लाखनावाडा सबस्टेशन येथून करण्याबाबत

(६) ३५६७९ (१२-०१-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चिंचपूर व पिंप्री कोरडे (ता.खामगाव, जि.बुलढाणा)गावांची वीजेची जोडणी सद्य:स्थितीत तोरणवाडा (ता.चिखली, जि.बुलढाणा) या सबस्टेशनवरून करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जोडणीमध्ये काही बिघाड झाल्यास नागरिकांना चिखली येथील कार्यालयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावातील नागरिकांना येणाऱ्या अडचणी व गैरसोय लक्षात घेता या गावांना लाखनवाडा (ता.खामगाव, जि.बुलढाणा) सबस्टेशन येथून वीजजोडणी करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सदर दोन गावांच्या विद्युत पुरवठयात बिघाड झाल्यास चिखली येथील कार्यालयात जावे लागत नाही. अटाळी वितरण केंद्र येथे तसेच ऑनलाईन पध्दतीने तक्रार दाखल करण्यात येते. विद्युत पुरवठयामधील बिघाड महावितरणकडून दूर करण्यात येतो.
(३) व (४) चिंचपूर, पिंपरी कोरडे या दोन्ही गावांना ३३/११ के. व्ही. लाखनवाडा (ता. खामगांव, जि. बुलडाणा) येथून विद्युत पुरवठा करण्याकरिता या परिसरातील काही भाग जंगलव्याप्त व डोंगराळ असल्यामुळे सदरहू भागातून विद्युत वाहिनी टाकणे तांत्रिकदृष्ट्या व भौगोलिकदृष्ट्या सुसाह्य नाही. परिणामी या दोन्ही गावांना सद्यस्थितीत ३३/११ के. व्ही. तोरणवाडा उपकेंद्रातुनच विद्युत पुरवठा करणे सोयीस्कर आहे.
अटाळी वितरण केंद्राअंतर्गत येणारी चिंचपूर, पिंपरी कोरडे ही दोन्ही गावे तोरणवाडा, ता. चिखली येथून जवळ असल्याकारणाने पूर्वीपासुनच सदर गावांचा विद्युत पुरवठा ३३/११ के. व्ही. तोरणवाडा उपकेंद्रातून करण्यात येत आहे.

राज्यात मानवी तस्करीचे प्रमाण वाढत असल्याबाबत

(७) ३५७६५ (१०-०१-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतात मागील वर्षभरात देशातून लहान मुले व महिलांच्या तस्करीची सुमारे १६५१ प्रकरणे असून, त्यापैकी राज्यात एकूण ५५१ प्रकरणांची नोंद करण्यात आली असून त्यांचा वापर लैंगीक शोषणासाठी झाल्याचा अहवाल नॅशनल क्राइम ब्युरोने प्रकाशित केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र मानवी तस्करीत अव्वलस्थानी असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणात मानवी तस्करी रोखण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) क्राईम इन इंडिया-सन २०२० या अहवालामध्ये भारतातील २८ घटक राज्यांमध्ये मानवी तस्करीची एकूण १६५१ प्रकरणे दाखल झाल्याचे नमूद आहे. यापैंकी मानवी तस्करीची १८४ प्रकरणे महाराष्ट्र राज्यात दाखल असून, यामध्ये एकूण ५५१ महिला पिडीतांची सुटका करण्यात आली आहे.
(२) क्राईम इन इंडिया-सन २०२० या अहवालामध्ये भारतातील २८ घटक राज्यांमध्ये सर्वाधिक प्रकरणे दाखल असलेल्या राज्यामध्ये महाराष्ट्र राज्याचा समावेश आहे. महाराष्ट्र आणि तेलंगणा सर्वाधिक १८४ प्रकरणे दाखल आहेत.
३) मानवी तस्करी रोखण्यासाठी शासनाकडून करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत-
क) दिनांक २५.०८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यात ४५ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

ख) लैंगिक शोषणाच्या विळख्यात अडकलेल्या महिलांची सुटका, पुनर्वसन आणि पुनरएकात्मीकरण करण्यासंदर्भात समन्वय करण्याकरिता अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे.
ग) समाजातील दुर्लक्षित घटक, महिला व बालक यांचे संबंधातील दाखल होणा-या गुन्ह्यांना प्रतिबंध आणि गुन्हे रोखणेकामी केंद्रीय गृह मंत्रालयाकडून प्राप्त मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व पोलीस घटकांना सूचित करण्यात आले आहे.
घ) अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ आणि भारतीय दंड संहितेमधील तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत दिनांक ०९.०२.२०२१ अन्वये सर्व पोलीस घटकांना सुचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून वाढीव वीज देयके आकारल्याबाबत.

(८) ३५८२६ (१२-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात विजेचा वापर हा अगदी कमी प्रमाणात असतांनाही नागरिकांना मागील अनेक महिन्यांपासून वीज देयके जास्त प्रमाणात आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारंवार होत असलेल्या लोडशेडिंगमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान होत असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जास्त आकारण्यात आलेल्या रक्कमेची वीज देयके कमी करुन शेतकऱ्यांना नियमिती वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) ज्या ग्राहकांची वीज देयकाबाबत तक्रार प्राप्त झाली अशा ग्राहकांच्या देयकांची पडताळणी करुन चुक आढळल्यास दुरुस्ती करुन देण्यात आलेली आहे. ग्राहकांच्या वीज बिलाबाबतच्या तक्रारीची टक्केवारी १.४३% एवढी नगण्य आहे. नोव्हेंबर २०२० ते नोव्हेंबर २०२१ या कालावधीमध्ये एकूण ४०९ शेतीपंप ग्राहकांचे रु. ३३.२५ लाख रक्कमेचे वीज देयके दुरुस्त करुन देण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागात कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना अखंडीत थ्री फेज वीजपुरवठा दिवसा ८ तास किंवा रात्री ८ तास असा चक्राकार पध्दतीने देण्यात येत असून, वेळापत्रकामध्ये दर महिन्याला चक्राकार पध्दतीप्रमाणे विभाग निहाय वेळेमध्ये बदल करण्यात येतो व त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सीना-माढा (ता.माढा,जि.सोलापूर) येथील उपसा सिंचन योजनेचा
शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला मिळाला नसल्याबाबत

(९) ३५८६२ (०६-०१-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सीना-माढा (ता.माढा, जि.सोलापूर)उपसा सिंचन योजना सन २००४ मध्ये अंशता कार्यान्वीत झालेली योजना असून या योजनेची एकुण १६०००० हेक्टर सिंचन निर्मीती क्षमता आहे. या उपसा सिंचन योजनेचे काम १७ वर्ष पुर्ण झाले असून जलसंपदा, महसूल व कृषी विभागातील अधिकाऱ्यामध्ये समन्वय नसल्यामुळे प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत मोबदला मिळालेला नाही, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, माढा तालुक्यातील निमगांव, बादलेवाडी, पिंपळनेर, शेडशिंगे, लऊळ, उजनी, चिंचोली, व्होळे, भेंड,

अरण, वरवडे, जाधववाडी, बैरागवाडी यासह अनेक गावातील शेतकऱ्यांनी सुरुवातीच्या काळात प्रकल्पासाठी जमिनी दिल्या त्यावेळी कामे सुरु होण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी मदत केली. शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यासाठी नुकसान भरपाईची रक्कम मागणी केली असता संयुक्त पंचनामे, जमिनीचे, फळझाडांचे मुल्यांकन होत नाही,मोजणी करणेसाठी अपूरा कर्मचारी वर्ग अशा विविध कारणांमुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळली नाही, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, सदर योजनेच्या भूसंपादन कामासाठी संयुक्त मोजणी करणे अभावी भूसंपादनाची कार्यवाही प्रलंबित असल्यामुळे भूसंपादन तातडीने करणेची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरहू योजनेची भूसंपादन कामे विहीत कालावधीमध्ये पुर्ण करुन संबंधित शेतकऱ्यांच्या संपादीत केलेल्या जमिनींचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
मंजूर द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार सीना-माढा प्रकल्पासाठी एकंदर १०१७.४६ हे. इतक्या खाजगी क्षेत्राची आवश्यकता होती. तथापि प्रकल्पांतर्गत उर्वरीत कामांसाठी शासनाच्या बंद नलिका वितरण प्रणालीचा अवलंब केल्याने प्रकल्पासाठी अधिग्रहित करावयाच्या क्षेत्रामध्ये सुमारे ३७ हे. क्षेत्र इतकी बचत झाली असून त्यानुसार आता एकूण ९८१ हे. क्षेत्र आवश्यक आहे.
त्यापैकी भूसंपादन कायदा १८९४ अन्वये ३९० हे. व नवीन भूसंपादन कायदा २०१३ अन्वये दि.२५/०१/२०१७ मधील निर्देशानुसार थेट खरेदीने २१४ हे. असे एकूण ६०४ हे. क्षेत्र अधिग्रहित करुन संबंधीतांस मोबदला अदा करण्यात आला आहे. तसेच २४९ हे. क्षेत्र अधिग्रहित करणेसाठी नवीन भूसंपादन कायद्यान्वये थेट खरेदीने संपादनाची प्रक्रिया प्रगतीत आहे. उर्वरित १२८ हे. क्षेत्राची भूसंपादन प्रक्रिया हाती घेणे शिल्लक आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
नमूद गावातील कालव्यासाठी एकंदर ६२८ हे. क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ४५५ हे. आर. (३०२ हे.आर नियमित पध्दतीने आणि १५३ हे. आर. क्षेत्र थेट खरेदीने) क्षेत्र अधिग्रहीत करणेत आले असून ११३ हे. क्षेत्र खरेदी प्रक्रिया सुरु आहे. त्यासाठी सुमारे रु.४५ कोटी इतका मोबदला अदा करण्यात आला आहे. उर्वरित प्रकरणी ६० हे. क्षेत्र अधिग्रहीत करण्याची प्रक्रिया विविध स्तरावर सुरु आहे.
(३) होय.
(४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे मागणीनुसार जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे लोकप्रतिनिधी, बाधित शेतकरी व संपादन मंडळ यांची बैठक घेण्यात आली असून, सदर बैठकीमधील दिलेल्या निदेशानुसार संयुक्त मोजणी प्रक्रिया सुरु आहे.
मोबदला वाटपाचे काम प्रगतीत असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर शहरात दिवसेंदिवस चोरीचे प्रमाण वाढत असल्याबाबत

(१०) ३६०५८ (१०-०१-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरात एकाच दिवशी जुना कुंभारी नाका, मडकी वस्ती व रुपाभवानी रोड ते डी मार्ट रोड येथे मंगळसूत्र हिसकावण्याच्या तीन घटना घडल्या असून या तीनही घटनांमध्ये सुमारे पावणेदोन लाखांचा ऐवज चोरीला गेला असल्याचे वृत्त दिनांक १४ सप्टेंबर, २०१२ रोजी व त्यासुमारास प्रसिद्ध झालेली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत पोलिस निरीक्षकांनी तपास केला आहे काय, तपासाअंती चोरांना पकडण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितांवर कोणती कार्यवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१), (२) व (३) सोलापूर शहरातील मडकी वस्ती येथे मंगळसूत्र हिसकावून नेल्याप्रकरणी चावडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६३७/२०२१, भा.दं.वि.कलम ३९२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रुपाभवानी मंदिर ते डी मार्ट सर्व्हीस रोड दरम्यान गळ्यातील दागिने चोरुन नेल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गु.र.नं.४३७/२०२१, भा.दं.वि. कलम ३९२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जागृती मारुती मंदिरासमोर मंगळसूत्र हिसकावल्या प्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गु.र.नं.४३६/२०२१, भा.दं.वि. कलम ३९२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर तिन्ही गुन्ह्यांतील आरोपींना अटक करण्यात आली असून गु.र.नं.६३७/२०२१ मध्ये दिनांक ११.३.२०२२ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. इतर दोन गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतक-यांकडून वीज देयक वसुलीसाठी महावितराणकडून पुरविण्यात येणाऱ्या विद्युत पुरवठा पुरविण्याबाबत

(११) ३६१०८ (१२-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतक-यांकडून वीज देयक वसुलीसाठी तसेच गावठाण वीज देयक व पाणीपुरवठा करणा-या यंत्रणेकडून वीज देयक वसूलीसाठी महावितरण कंपनीकडून रोहीत्रयंत्र (डी.पी.) बंद करुन ८ तासा ऐवजी-२ तास थ्री फेज विदयुत पुरवठा करण्यात येत असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीनीकडून महावितरण कंपनीस तीव्र आंदोलन करण्याचा इशारा माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, ऐन दिवाळीत वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
सोलापूर जिल्हयातील शेतीपंप ग्राहकांकडे माहे सप्टेंबर-२०२० पर्यंत रु. ५२०८.३८ कोटी थकबाकी आहे. कृषी धोरण-२०२० अंतर्गत शेतीपंप वीज ग्राहकांना सवलत देऊन रु. ३५९९.४८ कोटी व सप्टेंबर-२०२० नंतरच्या शेतीपंपाचे वीज बिलांची रु.८६८.०५ कोटी अशी एकूण रु. ४४६७.५३ कोटी थकबाकी शिल्लक आहे. दिवाळीपूर्वी सोलापूर जिल्हयात शेतीपंप वीज बिल भरणा मोहिम राबवून ज्या रोहित्रांवरील ग्राहकांनी अद्यापपर्यंत कोणतीही थकबाकीची रक्कम भरणा केलेली नाही, अशी वितरण रोहित्र बंद करण्यात येत होती. परंतु, शेतकऱ्यांना दैनंदिन जीवनासाठी व जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी २ तास विद्युत पुरवठा चालू करण्याची विनंती संबंधित कृषी ग्राहक व स्थानिक लोकप्रतिनिधींकडून होत असल्यामुळे, महावितरण कंपनीकडून पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी १ ते २ तास वीज पुरवठा सप्टेंबर-२०२१ या महिन्यात करण्यात येत होता.
(२) दिवाळीच्या कालावधीमध्ये महावितरणव्दारे कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील कृषी पंपाच्या जोडणीसाठी निधी देण्याबाबत

(१२) ३६११५ (१२-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील एकूण २३ हजार ८५१ कृषी पंपाच्या जोडण्यासाठी सुमारे ३३३ कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषि पंपाना विज जोडण्या मिळत नसल्याने पिकांचे नुकसान होत असल्याचे आढवूंन निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करुन कृषी पंपाना जोडणी मिळण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हयामध्ये दिनांक १५.११.२०२१ पर्यंत कृषी पंप वीज पुरवठयासाठी १२४९९ अर्जदार पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

याबाबत सप्टेंबर-२०२१ वा त्यादरम्यान वृत्तपत्रामध्ये कोणतीही बातमी किंवा तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) मार्च-२०१८ पूर्वी पैसे भरुन प्रलंबित १,३४४ अर्जदारांना वीजपुरवठा करण्यासाठी उच्चदाब वितरण प्रणाली अंतर्गत व सौर कृषीपंप योजने अंतर्गत वीज जोडण्या देण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. दिनांक ०१.०४.२०१८ नंतर पैसे भरुन प्रलंबित ११,१५५ अर्जदरांना कृषी वीज धोरण-२०२० अंतर्गत वीज जोडण्या देण्याचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणातील शेती पंपाना शेती Ag अदर विभागात केलेल्या वर्गीकरणाबाबत

(१३) ३६१३७ (१२-०१-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणामध्ये आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू इ. फळपिके घेतली जात असुन सदर पिकांसाठी महावितरण कंपनीकडून Ag पंपाची कनेक्शने दिले जात असताना महावितरण कंपनीच्या परिपत्रक क्र. २४३, दि. ०३/०७/२०१५ नुसार नारळ, सुपारी, आंबा, चिकू या बागांना Ag अदर सदरात गणना करुन सदर शेतकऱ्यांकडून Ag अदर प्रमाणे सन २०१५ पासून आकारणी करुन बीले अदा केली आहेत. हे खरे आहे काय.

(२) असल्यास, बागायती पिकांमध्ये ऊस, केळी, संत्र, द्राक्ष इ. पिके येत असून त्या बागायती पिकांसाठी वेगळा दर आकारण्याचा येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू व नर्सरी ही देखील बागायती पिके असूनदेखील यांना वेगळी वीजबील आकारणी केली जाते हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीज दर आदेश दि. २६.०६.२०१५ अन्वये फळ बाग व शेती पुरक कारणांसाठी वापरात असलेल्या वीज वापरांची वर्गवारी “कृषी इतर” मध्ये समाविष्ट केली आहे. त्या अनुषंगाने सन २०१५ पासून सदर ग्राहकांना “कृषी इतर” ही वर्गवारी लागू करण्यात आलेली आहे.

(२) मा. विद्युत नियामक आयोगाने वीज दर आदेशानुसार वीज आकारणी करण्यात येत आहे.

(३) मा. विद्युत नियामक आयोग यांचे वीज दर आदेशानुसार फलोत्पादन या गटात मोडणाऱ्या पिकांना "कृषी-इतर" या वर्गवारी अंतर्गत वीजदर आकारणी होत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

विमान नगर (जि.पुणे) येथील अवैध हुक्का बारवर पोलिसांनी केलेल्या कारवाईबाबत

(१४) ३६१७७ (१०-०१-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विमान नगर (जि.पुणे) येथे सुरु असलेल्या अवैध हुक्का बारवर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचा निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शहरामध्ये शेकडो अवैध हुक्का बार राजरोसपणे सुरू असल्याचे निदर्शनास आले तसेच सुरू असलेले अवैध हुक्का बार किती आहेत याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय.
पुणे शहर पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रातील विमानतळ पोलिस स्टेशन हद्दीमध्ये सन २०२१ मध्ये अवैधरित्या चालू असलेल्या ०२ अवैध हुक्का बारवर भादंवि कलम १८८, कलम २६८, कलम २६९ व कलम २७० तसेच सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम-२०१८ चे कलम ४-अ, २१-अ अन्वये ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) व (३) पुणे शहर पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्राअंतर्गत अवैधरित्या सुरु असलेल्या हुक्का बारवर खालील प्रमाणे कारवाई करुन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सन २०२१			
पोलिस स्टेशन	**गुन्हे**	**अटक आरोपी**	**सद्यस्थिती**
विमानतळ पो.स्टे.	०३	०९	न्यायप्रविष्ट
भारती विद्यापीठ पो.स्टे	०१	०१	तपासावर
चतु:श्रृंगी पो. स्टे.	०२	०२	न्यायप्रविष्ट
कोंढवा पो.स्टे.	०५	१६	०४ न्यायप्रविष्ट ०१ तपासावर
एकूण	११	२८	--

सन २०२१			
पोलिस स्टेशन	**गुन्हे**	**अटक आरोपी**	**सद्यस्थिती**
भारती विद्यापीठ पो.स्टे	०१	०८	तपासावर
कोंढवा पो.स्टे.	०५	१५	तपासावर
चंदननगर पो.स्टे.	०१	०१	तपासावर
हडपसर पो.स्टे.	०१	०२	तपासावर
एकूण	०८	२६	--

(४) प्रश्न उद्भवत नाही.

केज अंबाजोगाई (जि. बीड) या तालुक्यात उच्चदाब प्रणाली योजनेंतर्गत सिंगल फेज डीपी ची कामे करण्याबाबत

(१५) ३६२६४ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज, अंबाजोगाई, बीड (जि.बीड) या तालुक्यात उच्चदाब प्रणाली योजनेंतर्गत (HVDS) माहे एप्रिल, २०१८ पूर्वीची कामे मंजूर करण्यात आली असून देखील उक्त तालुक्यात जवळपास एक हजार पेक्षा जास्त लोकांचे उच्चदाब प्रणाली योजनेंतर्गत (HVDS) सिंगल डीपी बसवण्याची कामे अद्यापही झालेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, माहे एप्रिल २०१८ नंतर लोकांनी शेतीपंपाचे कोटेशन भरूनही त्यांना सिंगल डीपी HVDS अंतर्गतही मिळत नसून ६३ व १०० च्या नवीन ट्रान्स फार्मरचे कामेही मंजूर होत नसल्याने, शेतकरी त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय

(३)असल्यास, माहे एप्रिल २०१८ च्या आधीची HVDS अंतर्गत मंजूर सिंगल फेज डीपी ची कामे व माहे एप्रिल २०१८ नंतर कोटेशन भरलेल्या शेतकऱ्यांचे HVDS अंतर्गत नवीन ट्रान्सफार्मर बसवून कोटेशन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास उर्जा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :(१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

एप्रिल २०१८ नंतर कृषी धोरण २०२० अंतर्गत ६३ के. व्ही. ए. चे ११९ व १०० के. व्ही.ए. चे ४२ एवढे रोहित्र मंजूर केले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) योजनेंतर्गत केज, अंबाजोगाई, बीड तालुक्यामध्ये अनुक्रमे १६८८,६७८,६५४ ग्राहकांचे काम करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी केज तालुक्यामध्ये १०५७,अंबेजोगाई तालुक्यामध्ये ४१९ व बीड तालुक्यामध्ये ३१८ ग्राहकांचे काम पुर्ण झाले आहे. उर्वरित १२२६ ग्राहकांचे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामाकरीता मे.व्होल्टास प्रा.लि. यांना कार्यादेश देण्यात आला आहे. कामाच्या असमाधानकारक प्रगतीमुळे निविदेतील अटी व शर्तींनुसार मे. व्होल्टास प्रा.लि. यांना नोटिस-टू-करेक्ट व नोटिस-टू-टर्मिनेट बजाविण्यात आलेल्या आहेत. तसेच उर्वरित कामे त्वरित करण्याबद्दल सुचना वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

दिनांक १ एप्रिल, २०१८ पासून प्रलंबित असलेल्या कृषीपंप ग्राहकांना शासनाने मंजूर केलेल्या कृषीवीज धोरण-२०२० या योजनेअंतर्गत कृषीपंप वीज जोडण्या देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

देवळाली (जि.नाशिक) मतदार संघात विद्युत सबस्टेशन मंजूर करण्याबाबत

(१६) ३६३१८ (१२-०१-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळाली (जि.नाशिक) मतदार संघातील १) विल्होळी १० MVA X २ सबस्टेशन, २) शिंदे गाव येथे ५ MVA X २ चे दोन सबस्टेशन, ३) सैय्यद पिंप्री येथे ५ MVA X २ चे विद्युत सबस्टेशन मंजूर करुन त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक ९ जुन, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सबस्टेशन मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) शिंदे गाव व मौजे सैय्यदपिंप्री येथे (२X५ एमव्हीए क्षमतेच्या) नवीन उपकेंद्रांचे तांत्रिक प्रस्ताव शासनाच्या सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहेत.

तसेच जागे अभावी मौजे विल्होळी येथील (२x१० एमव्हीए क्षमतेच्या) प्रस्तावित उपकेंद्रातील तेथुन जवळच ३.५ किमी अंतरावर सध्या कार्यान्वित असलेल्या ३३/११ के. व्ही. सारुळ उपकेंद्रातील दोन्ही ५ एमव्हीए रोहित्र क्षमतेत वाढ करुन १० एमव्हीए क्षमतेचे रोहित्र बसविणे बाबतचा तांत्रिक प्रस्ताव शासनाच्या सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत प्रस्तावित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मून्शीनाका (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याबाबत

(१७) ३६३५९ (१२-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मून्शीनाका (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीत श्री.जगदीश पेणकर यांचे दुकान पुरात वाहून गेल्यामुळे त्यांच्या झालेल्या नुकसानीचे महसूल विभागाने केलेल्या पंचनाम्यात २ लाख ९० हजार रुपयांचे नुकसान भरपाई नमूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने श्री. जगदीश पेणकर यांच्या त्यांना ५० हजारांची मदत मंजूर केली असतांनाही सदर मदत महसूल विभागाने नामंजूर केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री. जगदीश पेणकर यांना पुरग्रस्त म्हणून भूखंड आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीची भरपाईही मिळाली नसल्याने सदरहू झालेल्या अन्यायामुळे त्यांनी दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजी राज्य शासनाने केलेल्या अन्याय विरोधात उपोषण करणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने श्री.जगदीश पेणकर यांना शासनाकडून मिळालेली मदत देण्यासाठी जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करुन त्यांना तात्काळ मदत देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०४-०४-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) खरे नाही,
(३) व (४) हे, अशंत: खरे आहे.

शासनाच्या पुनर्वसन निकषानुसार पुनर्वसन झालेल्या पूर रेषेतील नुकसानीसाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्याची तरतूद नाही. पूररेषेतील वास्तव्य करणाऱ्या पुर्नवसित लोकांना पावसाळ्यापूर्वी नोटीस देण्यात आल्या तसेच स्थानिक वृत्तपत्रामध्ये याबाबतची जाहीर सूचना देण्यात आली. तसेच यासंदर्भात श्री. पेणकर यांनाही नोटीस देण्यात आली.

श्री. पेणकर यांनी उपोषण करण्यासंदर्भात तहसिल कार्यालय राजापूर यांना दिलेल्या अर्जानुसार तहसिलदार राजापूर यांनी दि. १२.१०.२०२१ च्या पत्रान्वये श्री. पेणकर यांचे दुकान पूररेषेखाली असल्याने त्यांचे नुकसान भरपाईचे प्रकरण मंजूर करता येत नसल्याने त्यांना उपोषणाचा मार्ग अवलंबू नये याबाबत कळविण्यात आले.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्ह्यातील साकळाई उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत

(१८) ३६५७४ (०६-०१-२०२२). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील साकळाई उपसा जलसिंचन योजनेस सन १९९८ मध्ये म्हणजे जवळपास २५ वर्षापूर्वी तत्कालीन शासनाने तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत अहमदनगर व श्रीगोंदा तालुक्यातील धोसपुरी, साकोळा कासार, खंडगाव, बागार्डे, रुईखेल आदि गावांसह सुमारे ३२ गावांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्रीगोंदा व नगर तालुक्यातील जी गावे या योजनेच्या कक्षेत येतात ती गावे कायमस्वरुपी दुष्काळी असून सदर योजनेमुळे त्या परिसरातील १२० पाझर तलाव, १० कोल्हापुरी बंधाऱ्यामधून पाणी साठवण होऊन १८ हजार ५०० इतके हेक्टर क्षेत्र बागायतीखाली येणार असून या योजनेवर ८०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना कार्यान्वित करण्याबाबत आजतागायत तत्कालीन शासनाने वेळोवेळी आश्वासने देऊनही कार्यवाही न झाल्यामुळे, तेथील सर्वसामान्य जनता, साकळाई कृती समितीच्यावतीने तसेच मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे जलसिंचन योजना तातडीने सुरु करण्याबाबत मागणी केली असल्याचे दि. ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, साकळाई उपसा जलसिंचन योजना तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) अद्याप प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित नसल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(४) होय.

लाभक्षेत्रातील मा. स्थानिक लोकप्रतिनिधी, साकळाई कृती समिती, सर्वसामान्य जनता यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे मागणीचे दि.२१.१०.२०२१ रोजीचे निवेदन दिले होते.

(५) कुकडी प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचे नियोजन झालेले असून सदर प्रकल्पीय पाणी वापरात साकळाई उपसा सिंचन योजनेचा समावेश नाही. साकळाई योजनेचे लाभक्षेत्र हे अहमदनगर जिल्हयातील अहमदनगर व श्रीगोंदा तालुक्यातील यापूर्वीच जलसंपदा / जलसंधारण विभागाने बांधलेल्या ल. पा. तलाव, पाझर तलाव व को.प. बंधा-यांचे लाभक्षेत्र आहे. कोकणातून पश्चिम वाहीनी नद्यांचे वाहून जाणारे पाणी पूर्वेकडे वळविणेसाठीच्या प्रस्तावास शासन पत्र दि. ४.३.२०२० अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार वळण योजनांचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे. सदर वळण योजनांद्वारे वळविणेत येणा-या पाण्याची निश्चिती झालेनंतर सदर योजनेसाठी पाणी उपलब्धता अंतिम करणे शक्य आहे. त्यामुळे, साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी उपरोक्त प्रमाणे पाणी उपलब्ध झालेनंतर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

जलसंपदा विभागातील पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचा घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत

(१९) ३६५९१ (०६-०१-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या जलसंपदा विभागातील वर्ग तीन व चारची पदे जसे कनिष्ठ लिपिक, टंकलेखक, कालवा निरिक्षक, मोजणीदार, शिपाई, चौकीदार , वाहनचालक, धरणांची सुरक्षा करणारे गार्ड या पदांची भरती बंद होणार असून शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, आरेखक या पदांची भरती कंत्राटी पध्दतीने करण्यात येत असल्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे जलसंपदा विभागाचे खाजगीकरण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलसंपदा विभागातील कनिष्ठ लिपिक, टंकलेखक, कालवा निरिक्षक, मोजणीदार, शिपाई, चौकीदार , वाहनचालक, धरणांची सुरक्षा करणारे गार्डपदाची भरती बंद तसेच शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, आरेखक या पदांची भरती कंत्राटी पध्दतीने करण्याबाबत शासनाकडून कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त पदांच्या भरतीबाबत शासनाची भूमिका काय आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :(१) व (२) हे खरे नाही.
(३) कंत्राटी पध्दतीने भरती करण्याबाबत निर्णय झाला नसल्याने त्याबाबत कार्यवाही वा उपाययोजना करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहराकरिता स्वतंत्र वीज मंडळ स्थापन करणेबाबत

(२०) ३६८९३ (१२-०१-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड शहरात महावितरण विभागाची पिंपरी व भोसरी ही दोन विभागीय कार्यालये पुण्यातील महावितरणाच्या गणेशखिंड मंडळ कार्यालयांतर्गत जोडली असल्याने शहरातील नागरिकांना वीज समस्यासाठी पिंपरी-चिंचवडच्या हद्दीपासून जवळपास २० कि.मी दूर महावितरणाच्या गणेशखिंड मंडळ कार्यालयात जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरात सहा लाखांपेक्षा अधिक उच्चदाब व लाखो लघुदाब ग्राहकाना वीज समस्या सोडविण्यासाठी नाहक त्रासाला सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास , पिंपरी-चिंचवड शहरातील वाढते नागरिकीकरण , औद्योगिकीकरण , आय टी हब यामुळे वाढती ग्राहक संख्या लक्षात घेता २ लाख ग्राहकांना एक विभागीय कार्यालय यानुसार शहरात तीन विभागीय कार्यालय व एक मंडळ कार्यालय याप्रमाणे महावितरणाच्या मंडळांची पुर्नरचना करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पिंपरी-चिंचवड शहरासाठी विजवितरण कार्यालयांची पुनर्रचना करून शहरासाठी स्वतंत्र मंडळ कार्यालय सुरु करणेबाबतचा प्रस्ताव मंजुरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, स्वतंत्र वीज मंडळ कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
पिंपरी व भोसरी येथील नागरिकांसाठी वीज विषयक कामांसाठी या परिसरात दोन विभागीय कार्यालये (पिंपरी व भोसरी) तसेच दोन्ही विभागाअंतर्गत प्रत्येकी तीन उपविभागीय कार्यालये अशी एकूण ०६ उपविभागीय कार्यालये आहेत. सदर कार्यालयामध्ये वेळोवेळी सर्व ग्राहकांच्या समस्यांचे निराकरण करण्यात येते.
(३) हे खरे नाही.
सद्यस्थितीत पिंपरी विभागात अंदाजे ४.१० लाख तसेच भोसरी विभागात अंदाजे ३.२७ लाख अशा प्रकारे पिंपरी-चिंचवड शहरात अंदाजे एकूण ७.३७ लाख वीज ग्राहक आहेत. सद्य: स्थितीत महावितरणच्या निकषांनुसार ही वीज ग्राहक संख्या कमी असल्यामुळे स्वतंत्र मंडळ कार्यालय सुरु करणे शक्य नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) सेक्टर ४० येथील इमारतीना अद्यापपर्यंत विज पुरवठा झाला नसल्याबाबत

(२१) ३७७२१ (२८-०३-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) सेक्टर ४० येथे सिडकोने सर्वासाठी घरे या तत्त्वानुसार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत उभारलेल्या गृहप्रकल्पातील २३ इमारतीना अद्यापपर्यंत विज पुरवठा झाला नसल्यामुळे लाभार्थी सदनिका धारकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी , २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागातील महावितरण कार्यालयात विज जोडणीसाठी मीटर उपलब्ध नसल्याने वीज जोडणीसाठी मीटर विकत आणा अन्यथा वीज मीटर उपलब्ध झाल्यावर वीज जोडणी दिली जाईल अशी उत्तरे महावितरण कार्यालयाकडून सदनिकधारकांना मिळत असल्याने सदनिकाधारकांना वारंवार महावितरण कार्यालयात फेऱ्या मारून सुद्धा विज मीटर जोडणी मिळत नसल्याने त्याच्यामध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त विभागातील गृहप्रकल्पाला तातडीने विज मिटर उपलब्ध करुन वीज जोडणी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे. माहे डिसेंबर, २०२१ ते जानेवारी, २०२२ दरम्यानच्या काळात महावितरणने उपरोक्त गृहप्रकल्पातील पैसै भरुन प्रलंबित ९३० अर्जदारापैकी ८६२ ग्राहकांना वीज जोडणी देण्यात आली. उर्वरीत ग्राहकांना ३१ जानेवारी, २०२२ रोजी वीज जोडणी देण्यात आली.

(२) हे अंशत: खरे आहे. महावितरणकडून आवश्यकतेनुसार मागणीप्रमाणे वीज मीटर ग्राहकांना देण्यात येऊन वीज पुरवठा केला जातो. तथापी, अपवादात्मक स्थितीमध्ये जर महावितरण कंपनीचे वीज मिटर उपलब्ध नसताना ग्राहकाला त्वरीत वीज जोड कनेक्शन आवश्यक असल्यास, महावितरणच्या परिपत्रकानुसार वीज ग्राहकांना मान्यता प्राप्त विक्रेत्याकडुन वीज मीटर खरेदी करता येत असल्याने तसा पर्याय उपरोक्त गृहप्रकल्पातील सदनिकाधारकांना उपलब्ध असल्याची माहिती महावितरणच्या शाखा कार्यालयाकडुन जानेवारी, २०२२ च्या सुमारास देण्यात आली होती. ग्राहकाने खुल्या बाजारातून वीज मिटर खरेदी केल्यास मा. विद्युत नियामक आयोगाने निर्धारीत केल्याप्रमाणे त्या मिटरची किंमत त्या ग्राहकाच्या वीज बिलामध्ये वजावट करुन देण्यात येते.

(३) उपरोक्त गृहप्रकल्पातील एकूण ९४३ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले. त्यातील १३० अर्जदारांना महावितरणने मीटरची उपलब्धता करुन दि. ३१.०१.२०२२ रोजी योज जोडण्या दिल्या व १३ अर्जदारांचे फर्म कोटेशन न भरल्यामुळे वीज पुरवठा जोडण्याचे काम प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी येथे आयोजित केलेल्या जलपरिषदेमध्ये कोकण पाटबंधारे महामंडळाच्या कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या प्रतिपादनाबाबत

(२२) ३७८६१ (०७-०४-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथे आयोजित केलेल्या जलपरिषदेच्या निमित्ताने सादरीकरण करताना कोकण पाटबंधारे महामंडळाच्या अभियंता वैशाली नारकर यांनी माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान कोयना अवजलातील ६७.५० टी.एम.सी. पाण्यापैकी ५० टी.एम.सी. पाणी उत्तरेकडील खोऱ्यात वळवले तर त्यामधून आत्ताच्या दरानुसार ४२ कोटी रूपये उपकरापोटी रत्नागिरी जिल्ह्याला मिळतील तसेच अवजलातील १७.५ टी.एम.सी. पाणी वापरासाठी छोटे प्रकल्प उभारता येतील व त्यासाठी या निधीतील ४० टक्के रक्कम खर्च करता येऊ शकते अशाप्रकारचे प्रतीपादन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलपरिषदेच्यावेळी कोयनेचे अवजल पाणी टनेल द्वारे समुद्रात सोडा अशी मागणी होत आहे परंतु अवजलाचे आर्थिक संपत्तीत रूपांतर केल्यास रत्नागिरी जिल्हाला फायदा होईल तसेच सगळे पाणी कोकणासाठी वापरावे ही मागणी व्यवहार्य नाही. या पाण्यावर उपसा सिंचन योजना राबविल्यास त्या खर्चिक ठरू शकत असल्याने, वशिष्ठीचे पाणी ३६ गावातील क्षेत्राला करण्यात येणार होते पण तो प्रकल्प खर्चिक असल्यामुळे मागे पडला असून सध्या कोकणाचा जलआराखडा तयार झाला असून त्यात ३६.५० टी.एम.सी. पाणी आणण्यासाठीचा अभ्यास केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रत्नागिरीत आयोजित केलेल्या जलपरिषदेच्या निमित्ताने कोकण पाटबंधारे महामंडळाच्या कार्यकारी अभियंता वैशाली नारकर यांनी सदरहू जलपरिषदेत प्रतिपादन केलेल्या बाबींसंदर्भात शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला, आजमितीस कोणताही ठोस निर्णय घेतला नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार जलपरिषदेमध्ये प्रतिपादन केल्याप्रमाणे ठोस निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

पश्चिम वाहिनी नदी खो-याच्या एकात्मिक राज्य जल आराखडयास दि. २२.६.२०१८ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य जल परिषदेच्या पाचव्या बैठकीत मान्यता देणेत आली आहे. सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी कोयना जलविद्युत प्रकल्पातुन कोयना नदीचे ६७.५ अघफू पाणी वीज निर्मीतीनंतर कोकणात सोडण्यात येते. त्यापैकी बहुतांश पाणी समुद्रात विनावापर वाहून जात असल्याने सदर पाण्याचा वापर कोकण प्रदेशात कोळकेवाडी धरणातून ग्रॅव्हिटी ग्रीडद्वारे सिंचन / बिगर सिंचन पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने सविस्तर अभ्यास करणे विषयीच्या सुचना केल्या आहेत.

त्यानुसार सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासन अंगीकृत WAPCOS Ltd., नवी दिल्ली या अभिकरणाकडून करून घेण्याची कार्यवाही कोकण पाटबंधारे विकास महामंडळामार्फत प्रगतीत आहे.
(३) शासन पत्र दि. १२.१०.२०१८ अन्वये ६७.५ अब्ज घन फुट कोयना अवजलाच्या वापराकरीता PFR / DPR तयार करण्यासाठी केंद्र शासन अंगीकृत WAPCOS Ltd. नवी दिल्ली यांना सल्लागार म्हणून नेमण्यास मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने WAPCOS यांचेकडून प्राप्त कोयना अवजल वापराकरीता PFR तयार करणेसाठी होणाऱ्या खर्चाच्या अंदाजपत्रकास शासनाची प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

प्रस्तावित बाबी अद्याप प्राथमिक स्तरावर आहेत. सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास करून त्याच्या आर्थिक व भौतिक व्यवहार्यतेची पडताळणी करून शासन स्तरावर अंतिम निर्णय घेणे शक्य आहे.
(४) प्रस्तावित बाबी अद्याप प्राथमिक स्तरावर आहेत. सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास करून त्याच्या आर्थिक व भौतिक व्यवहार्यतेची पडताळणी करून शासन स्तरावर अंतिम निर्णय घेणे शक्य आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात महावितरण कंपनीने शेतक-यांकडून अवाजवी वीज देयके आकारल्याबाबत

(२३) ३७९७९ (३१-०३-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महावितरण कंपनीने शेतक-यांकडून अवाजवी वीज देयके आकारली असून कंपनीने दरवर्षी होणारी १२ हजार कोटींची वीजचोरी व कंपनीत होत असलेला गैरव्यवहाराकडे जाणीपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महिलांना ट्वीटर अकाऊंट व सोशल मिडीयाच्या माध्यमातून आक्षेपार्ह मजकूर टाकल्याबाबत

(२४) ३८००१ (१२-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महिलांना ट्वीटर अकाऊंट व सोशल मिडीयाच्या माध्यमातून आक्षेपार्ह मजकूर टाकून लक्ष केले जात असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राज्यात सायबर क्राईमच्या घटनाही दिवसेंदिवस वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) होय.
(२) राज्यात सन २०२० मध्ये ५६५७ सायबर गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी १३३५ गुन्हे उघड झाले आहेत. सदर गुन्हयात एकूण १६०३ आरोपितांना अटक करण्यात आली आहे. सन २०२१ मध्ये ५५६० सायबर गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी १३७३ गुन्हे उघड झाले आहेत. सदर गुन्हयात एकूण १७०६ आरोपितांना अटक करण्यात आली आहे. तसेच एप्रिल २०२२ पर्यंत २४४१ सायबर गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी ३५३ गुन्हे उघड झाले आहेत. सदर गुन्हयात एकूण ३३५ आरोपितांना अटक करण्यात आली आहे.
(३) दि.०२.०१.२०२२ रोजी ट्वीटर धारकांनी मुस्लिम महिलांचे फोटो अनैतिक व अश्लील कारणासाठी ऑनलाईन विक्री करण्यासाठी ट्वीटर हँडलवर व बुलीबाई ॲपवर अपलोड केल्यामुळे ६ आरोपितांविरूध्द पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.०१/२०२२ भा.दं.वि. कलम १५३(अ), १५३(ब), २९५(अ), ३५४(ड), ५०९,५००, ३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हा तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगरातील विकास कामांचा प्रारुप आराखड्याबाबत

(२५) ३८०५८ (१८-०४-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील सन २०२२-२३ च्या विकास कामांचा प्रारुप आराखडा शासनाने मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रारुप विकास आराखड्याचे स्वरुप काय आहे,
(३) अद्याप प्रारुप विकास आराखडा मंजूर करण्यात आला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२२-२३ अंतर्गत विविध प्रशासकीय विभागांच्या १२३ जिल्हास्तरीय योजना निश्चित करण्यात आलेल्या आहेत. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय बैठकांनंतर जिल्ह्यासाठी अंतिम करण्यात आलेला नियतव्यय विचारात

घेऊन जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करीता निश्चित करण्यात आलेल्या १२३ योजनांसाठी निधीचे वाटप करणे या कार्यप्रणालीस जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा तयार करणे असे संबोधिले जाते. मुंबई उपनगर जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक १०/०१/२०२२ रोजीच्या बैठकीत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) च्या प्रारुप आराखडयास मंजूरी घेऊन सदर आराखडा मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे अध्यक्ष्ातेखाली दिनांक २४/०१/२०२२ रोजी झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत प्रारुप आराखडा मंजूर करण्यात आला आहे. तर अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेंतर्गतच्या आराखड्यास शासन स्तरावरुन अनुक्रमे सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागांनी मंजूरी दिली आहे.

(२) व (३) आर्थिक वर्ष सन २०२२-२३ करीता मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी खालीलप्रमाणे नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

सर्वसाधारण योजना - रुपये ८४९ कोटी
अनु.जाती उपयोजना - रुपये ५१ कोटी
आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना - रुपये ५.७७ कोटी

पनवेल-उरण (जि.रायगड) येथे भ्रमणध्वनीची चोरी व फसवणूकींच्या प्रकरणात वाढ होत असल्याबाबत

(२६) ३८२२२ (१२-०४-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल-उरण (जि.रायगड) येथे भ्रमणध्वनीची चोरी व फसवणूकींच्या प्रकारात वाढ झाल्याने नागरिकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू चोरीच्या भ्रमणध्वनीमधून एटीएम कार्डची माहिती चोरुन खात्यामधून लाखो रुपयांची रक्कम परस्पर काढून नागरिकांची फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित पोलीस विभागातील अपुरे मनुष्यबळ व सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ते पाऊल न घेतल्यामुळे चोऱ्यांच्या प्रकारात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मनुष्यबळ व सुरक्षिततेच्या दृष्टीने साधन सामुग्री पुरविण्याबाबत कोणत्या उपाययोजना वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) पनवेल-उरण (जि.रायगड) येथे चोरीच्या भ्रमणध्वनीमधून एटीएम कार्डची माहिती चोरुन खात्यामधून लाखो रुपयांची रक्कम परस्पर काढून नागरिकांची फसवणूक होत असल्याबाबत गुन्हा दाखल नाही.

(३) व (४) उपलब्ध मनुष्यबळाचा कौशल्यपूर्वक वापर करुन छोटया मोठया चोऱ्यांच्या प्रकारांना प्रतिबंध करण्याबाबत योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन नागरिकांमध्ये याबाबत जनजागृती करण्यात येते. जानेवारी, २०२१ च्या तुलनेत जानेवारी, २०२२ मध्ये मोबाईल चोरी व फसवणूकीच्या गुन्हयात घट झाली आहे.

पोलीस स्टेशनकडील उपलब्ध मुनष्यबळाचा वापर करुन गुन्हयांना प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने विशेष प्रयत्न करण्यात येतात. पोलीस आयुक्तालय कार्यालयास पोलीस महासंचालक कार्यालयाकडून आवश्यक ती साधनसामुग्री पुरविण्यात येते. सदर साधनसामुग्रीचा पोलीस आयुक्त कार्यालयामार्फत योग्य तो वापर करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील महावितरणच्या वीज कर्मचाऱ्यांमध्ये होत असलेले करोना संक्रमणाचे प्रमाण रोखण्याबाबत

(२७) ३८३४० (३१-०३-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुरात करोनाच्या तिसऱ्या लाटेचे संक्रमण सुरु असतानाच महावितरण कंपनीने दि. १ जानेवारी ते १० जानेवारी, २०२२ या कालावधीत वीज देयक थकबाकी असलेल्या ६५० घरांची विज जोडणी तोडली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, वीज कर्मचाऱ्यांचा सदरहू वीज जोडणी तोडण्याच्या कारवाईच्या दरम्यान थेट ग्राहकांशी संपर्क येत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये करोना संसर्गाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, महावितरणच्या वीज कर्मचाऱ्यांमध्ये होत असलेले करोना संक्रमणाचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे. दि.१ जानेवारी ते १० जानेवारी, २०२२ या कालावधीत नागपूर शहर अंतर्गत ७८६ घरगुती, १९३ वाणीज्य, ४ औद्योगीक व १५ तात्पुरत्या ग्राहकांची वीज देयक थकबाकी पोटी वीज जोडणी तोडण्यात आली.

(२) हे खरे नाही. कोविड संबंधी केंद्र व राज्य शासनाच्या तसेच स्थानिक प्रशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे तसेच आदेशांचे अंमलबजावणी करुन ग्राहकांना वीजे संदर्भातील सर्व सेवा देण्याबाबत नियोजन करण्यात येते.

(३) महावितरण कंपनीच्या विविध क्षेत्रिय कार्यालयांमध्ये कोव्हिड १९ प्रतिबंधात्मक लसीकरण सुविधेची शिबीरे संबंधीत जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या सहकार्याने घेण्यात येवून, वीज कर्मचाऱ्यांना लसीकरणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच वेळोवेळी महाराष्ट्र शासनाद्वारे निर्गमित केलेल्या सुचनांचे अवलंब करुन, महावितरण कंपनीतील कार्यरत कर्मचारी व बाह्यस्त्रोत कामगारांना मास्क, निरजंतुकीकरण द्रव्य यांचे वाटप करण्यात आले व कर्मचाऱ्याला कोव्हिड १९ झाल्यास त्वरित प्राथमिक उपचार मिळावेत याकरीता अलगीकरण कक्ष (Isolation) तयार करण्यात आलेले आहेत. तसेच वारंवार हात स्वच्छ धुणे, लसीकरण करणे, सामाजिक अंतर राखणे, पोषक आहार घेणे इत्यादी सुचना प्रदान करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे कोव्हिड.१९ या विषाणूचा वाढता प्रादुभाव पाहता, कर्मचारी काम करत असलेल्या ठिकाणीच कोव्हिड १९ संदर्भातील चाचण्या (Rapid Antigen Test) उपलब्ध करुन दिल्या आहेत. जेणेकरुन कर्मचारी संक्रमित झाल्यास त्यांच्यावर त्वरीत उपचार करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वीज वितरण यंत्रणा अद्ययावत करण्याकरिता महावितरणच्या
पायाभूत सुविधांच्या विकास कामात झालेला गैरव्यवहार

(२८) ३८३४९ (०९-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज वितरण यंत्रणा अद्यायावत करण्यासाठी महावितरणच्या पायाभूत सुविधांच्या विकास कामाकरिता सन २०१४-१९ या कालावधीत पायाभूत सुविधा विकास प्रकल्प-१ अंतर्गत झालेली कामे, पायाभूत सुविधा विकास प्रकल्प-२ अंतर्गत ६५०० कोटी रुपयाची तीच कामे सुचविण्यात आल्याने सदरहू प्रकल्पातील विकास कामांची तपासणी करण्यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या चौकशी समितीने एक महिना उलटूनही अद्याप शासनास याबाबतचा अहवाल सादर केला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशी समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त चौकशी समितीने माहे फेब्रुवारी २०२२ पर्यंत शासनास अहवाल सादर केला असल्यास त्यानुसार चौकशी अहवालाचे थोडक्यात निष्कर्ष काय आहेत, उक्त अहवाल्याच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) होय,
महावितरणव्दारा सन २०१४ ते सन २०१९ या कालावधीत राबविण्यात आलेल्या स्वनिधी, जिल्हा विकास समिती, राज्य, केंद्र वा इतर स्त्रोतांतील सहाय्याने राबविलेल्या पायाभूत प्रकल्पातील विविध मुद्यांवर तपासणी करुन त्यात झालेल्या अधिनियम/नियम/विनियम/MERC SoPs इ. च्या अनुषंगाने झालेल्या अनियमिततेची चौकशी करुन, त्याची कारणे यांची तपासणी करुन, अशा बाबी भविष्यात न होण्याच्या दृष्टीने मान्य योजना राबविताना अवलंबिण्यात आलेली कार्यपध्दती, त्यात बदल आवश्यक असल्यास त्याचा अभ्यास करुन उपाययोजना शिफारशीत करण्यासाठी दि. १५.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.
(२) सदर समितीने अद्याप शासनास अहवाल सादर केलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपाच्या वीज देयकामध्ये सवलत देण्याबाबत

(२९) ३८३५६ (०९-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शेतकऱ्यांना कृषी पंपांच्या वीज देयकातून ६६टक्के सवलत देण्याची मुदत मार्च २०२२ पर्यंत वाढवून देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात माहे जानेवारी २०२२ अखेर पर्यंत किती शेतकऱ्यांनी सदरहू योजनेत सहभाग घेऊन लाभ घेतला आहे व त्यापैकी या योजनेच्या लाभातून किती शेतकरी थकबाकी मुक्त झालेले तसेच राज्यातील किती शेतकऱ्यांकडुन अद्यापपर्यंत थकबाकी येणे बाकी असून थकबाकीची एकूण रक्कम किती आहे,
(४) असल्यास, उक्त थकबाकीदार शेतकऱ्यांकडून थकबाकी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे खरे नाही. "कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२०" चा कालावधी हा ३१ मार्च, २०२४ पर्यंत आहे. सदर धोरणांतर्गत योजनेच्या प्रथम वर्षा (एप्रिल २०२१ ते मार्च २०२२) कृषी ग्राहकाने भरलेल्या रक्कमे एवढी सवलत सुधारित थकबाकी मधून वजा केली जाते. कृषी ग्राहकांनी सुधारित थकबाकीच्या ५०% भरणा केल्यास उवरित ५०% रक्कम ही माफ होते व ते थकबाकीमुक्त होतील. प्रथम वर्षी ग्राहकाने योजनेचा लाभ घेतला नाही तर योजनेच्या दुसऱ्या वर्षी (एप्रिल २०२२ ते मार्च २०२३) कृषी ग्राहकाने भरलेल्या रक्कमेवर ३०% सवलत आहे. ग्राहकाने पहिल्या दोन वर्षात योजनेचा लाभ घेतला नसल्यास योजनेच्या तिसऱ्या वर्षी (एप्रिल २०२३ ते मार्च २०२४) कृषी ग्राहकाने भरलेल्या रक्कमेवर २०% सवलत आहे. अशाप्रकारे कृषी थकबाकीची रक्कम टप्याटप्याने भरण्यास मार्च २०२४ संपूर्ण मुभा देण्यात आली आहे. या ग्राहकांना सप्टेंबर २०२० पासुन त्यांचे चालू विज देयक भरणे मात्र क्रम:पाप्त आहे.
(२) राज्यामध्ये महावितरण कंपनीचे ४४,४९,६०१ थकबाकीदार कृषी वीजग्राहक आहेत. दि.१५.०२.२०२२ पर्यंत २१,५५,९५३ शेतकऱ्यांनी सदरहू योजनेत सहभाग घेऊन लाभ घेतला असून त्यापैकी ३,९५,०५९ शेतकरी थकबाकीमुक्त झाले आहेत.
दि. १५.०२.२०२२ पर्यंत "कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२०" नुसार ४०,५४,५७१ कृषी ग्राहकांकडे रु. २८,७०७ कोटी सुधारित थकबाकी आहे.

(४) थकबाकीदार कृषी ग्राहकांना “कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२०” अन्वये मार्गदर्शन व प्रोत्साहन देऊन योजनेचा लाभ जास्तीत जास्त कृषी ग्राहकांपर्यंत पोहचविण्यासाठी महावितरण प्रयत्नशील आहे. सदर धोरणानुसार कृषी ग्राहकांना त्यांचे चालु वीजबिल भरणे क्रमप्राप्त आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई ,ऐरोली विभागातील यादव नगर झोपडपट्टी परिसरात डीपी बॉक्स व विद्युत खांबावरील लोंबकळणा-या विद्युत वाहिन्यांमुळे नागरिकांच्या जीवितास धोका असल्याबाबत

(३०) ३८४०० (१९-०४-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली विभागातील यादव नगर झोपडपट्टी परिसरात डीपी बॉक्स व विदयुत खांबावरील लोंबकळणा-या विदयुत वाहिन्यांवरील वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, लोंबकळणा-या विदयुत वाहिन्यांमुळे नागरिकांच्या जीवितास धोका संभवण्याची भीती व्यक्त केली जात असल्याचे दि. १० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनास्थळी संबंधित अधिका-यांनी पाहणी करुन वीजपुरवठा अखंडित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे. सदर यादवनगर झोपडपट्टी परिसरात डीपी बॉक्स व विद्युत खांबावरील लोंबकळणाऱ्या विद्युत वाहिन्या डिसेंबर, २०२१ मध्ये बदलण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी झालेले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) संबंधित ऐरोली शाखा अभियंता यांनी पाहणी केली आहे आणि असे निदर्शनास आले की, विद्युत खांबावरील वाहिन्या जुन्या व जिर्ण झाल्या. त्यामुळे त्या वारंवार तुटतात. त्यासाठी अंदाजपत्रक मंजुर करून सदर परिसरातील विद्युत खांबावरील वाहिन्या बदलण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वीज विषयक बनावट संदेश पाठवून वीज ग्राहकांची फसवणूक होत असल्याबाबत.

(३१) ३८५९३ (३१-०३-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वीज देयकाच्या थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित करण्यात येणार असल्याने तातडीने संबंधित मोबाइल क्रमांकावर संपर्क करावा किंवा दुव्याला प्रतिसाद द्यावा, अशा स्वरूपाचे वीजविषयक बनावट संदेश पाठवून राज्यातील महावितरण वीज ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ग्राहकांची फसवणूक करणा-या संबंधीतांविरुद्ध गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) होय. चौकशीअंती असे आढळून आले की, ग्राहकांना संदेशाव्दारे, एका बनावट संकेतस्थळाचा दुवा (लिंक) क्रेडिट कार्ड/डेबिट कार्डाव्दारे, वीजेचे बिल भरण्यासाठी देण्यात येत होता. ज्याच्यात त्यांना क्रेडिट कार्ड/डेबिट कार्डाचा तपशील व ओ. टी. पी. विचारण्यात येत होता.

(३) महावितरणच्या ग्राहकांची फसवणूक करणाऱ्यांविरुध्द महावितरणने दि. २०.०१.२०२२ रोजी गृह मंत्रालय, केंद्र सरकार व्दारा संचलित राष्ट्रीय साइबर अपराध रिपोटिंग पोर्टल वर मुख्य कार्यालय व महावितरणच्या पुणे, कोकण, नागपूर, औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयांनी तक्रारी दाखल केल्या. तसेच दि. २१.०१.२०२२ रोजी पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे (बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स), मुंबई येथे आय.पी.सी. कलम ४१९, ४६५, ४६७, ४६८, ४७१, आणि मा.तं. अधिनियम कलम ६६(सी) नुसार एफ.आय. आर.(क्र.०४/२२) दाखल करण्यात आला. मुंबई सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार एका आरोपीस अटक करण्यात आली असून, तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. इतर चार आरोपी फरार असून तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपळगाव बु. (ता.भडगांव, जि. जळगाव) येथील गिरणा नदीवर बंधाऱ्याचे बांधकाम करणेबाबत

(३२) ३८६७३ (११-०४-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव बु. (ता.भडगांव, जि. जळगाव) येथील गिरणा नदीवर बंधाऱ्याचे बांधकाम करण्यात संदर्भात परिसरातील ग्रामस्थांकडून मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उपरोक्त कामास मंजुरीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री महोदयांना दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, सदर कामाची चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने गिरणा नदीवर बंधाऱ्याच्या बांधकामास मंजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) : (१) होय,

(२) होय,

(३) पिंपळगाव बु. (ता. भडगाव जि. जळगाव) येथे गिरणा नदीवर बंधाऱ्याची मागणी लोकप्रतिनिधी कडून करण्यात आलेली होती. मागणी नुसार बंधारा स्थळाची पाहणी केलेली आहे. तथापी तापी खो-याच्या मंजुर एकात्मिक जल आराखड्यानुसार गिरणा उपखो-यातील उपलब्ध पाण्याचे नियोजन पुर्ण झाले असल्याने नवीन बंधाऱ्यांसाठी पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे मागणी केलेल्या बंधाऱ्यास मंजुरी देता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उपळी (ता. वडवणी जि.बीड) कुंडलिका या प्रकल्पासाठी कॅनॉल ऐवजी बंद पाईपलाईन द्वारे लाभक्षेत्रात पाणी पुरवठा करणेबाबत

(३३) ३८७३१ (०१-०४-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपळी (ता. वडवणी जि.बीड) कुंडलिका या प्रकल्पासाठी कॅनॉल ऐवजी बंद पाईपलाईन द्वारे लाभक्षेत्रात पाणी पुरवठा करणेबाबतच्या स्थानिक लोकप्रतिनिधीच्या निवेदनास अनुषंगाने दिनांक.१३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा. मंत्री (जलसंपदा) यांच्या झालेल्या बैठकीत मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक (लाक्षेवि), औरंगाबाद यांना सदर प्रस्तावास तातडीने मंजुरी देण्याचे निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय करणे आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) होय,
तत्कालीन मा.मंत्री जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली दि.०६.०४.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत विषयांकित काम पूर्ण करण्याबाबत सूचना दिली आहे.
(२) व (३) कुंडलिका मध्यम प्रकल्पाच्या उजव्या कालव्यावरील लोणवळ तलाव दरम्यान बंद नलिकाद्वारे कालवा जोडणीचे कामास विशेष दुरुस्ती अंतर्गत दि.२०.०७.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

माजलगाव (जि.बीड) मतदार संघातील साठवण तलावाच्या प्रस्तावाबाबत

(३४) ३८७४५ (०१-०४-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माजलगाव (जि.बीड) मतदार संघातील ० ते ६०० हे. मर्यादेतील २२ साठवण तलावाच्या प्रस्तावास जलसंधारण विभाग ऐवजी जलसंपदा विभागा मार्फत मान्यता देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक.१४ जून, २०२१ रोजी वा त्या सुमारास मा. मंत्री (जलसंपदा) यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त निवेदनाच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) मा. आमदार श्री. प्रकाश सुंदरराव सोळंके यांनी मागणी केलेल्या २१ लघु प्रकल्पांचे सिंचन क्षेत्र ६०० हे. पेक्षा कमी क्षेत्राचे असून ते जलसंपदा विभागाच्या कार्यक्षेत्रात न येता मृद व जलसंधारण विभागाच्या कार्यक्षेत्रात येतात. त्यामुळे दि.३१.०५.२०१७ च्या शासन निर्णयात बदल केल्यानंतरच विषयांकित कामे जलसंपदा विभागामार्फत घेणे शक्य होईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील व राष्ट्रीय महामार्ग क्र.३ मुंबई-नाशिकला जोडणाऱ्या वालकस बेहरे या गावालगत भातसा नदी पूल बांधण्याबाबत

(३५) ३९२६९ (०१-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील व राष्ट्रीय महामार्ग क्र.३ मुंबई-नाशिकला जोडणाऱ्या वालकस बेहरे या गावालगत भातसा नदीवरील पूल दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास झालेल्या पावसात खचून पुलाची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भातसा नदीवर मोठा पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजी झालेल्या पावसात भातसा नदीच्या डाव्या तीरावरील बाजूस पुलाच्या असलेल्या दोन्ही पार्श्व भिंतीची पडझड झालेली होती.
(२) होय,
सदर पुलाच्या झालैल्या पडझडीच्या अनुषंगाने कोकण पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालयाचे अंतर्गत सदर पार्श्व भिंतीच्या बांधकामाची दुरूस्ती सन २०२१ मध्ये करण्यात आली असल्याने, सद्य:स्थितीत पुलावरून सुरक्षित वाहतूक सुरू आहे.
सदर पुलास जोडले जाणारे दोन्ही तीरांवरील रस्ते हे जिल्हा परिषद, ठाणे यांच्या कार्यकक्षेतील असल्याने रस्त्यांच्या देखभाल दुरूस्तीचे काम हे बांध्काम विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांच्या अखत्यारीत येत आहे.
सद्यस्थितीत भातसा प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाले असल्याने या पुलाचा कोणत्याही प्रकारे जलसंपदा विभागाकडून वापर होत नाही. सद्यस्थितीत सदर पुलाचा वाळकस-बेहेरे या गावांच्या रहदारीसाठी वापर होत असल्याने सदर पूल कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे हस्तांतरीत करणेबाबतची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती येथील रेंज फोरेस्ट ऑफिसर दिपाली चव्हाण- मोहिते व बीड जिल्ह्यातील पूजा चव्हाण यांच्या आत्महत्या प्रकरणाबाबत

(३६) ३९२८० (०७-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथील रेंज फोरेस्ट ऑफिसर दिपाली चव्हाण- मोहिते यांनी लैंगिक छळ प्रकरणी आत्महत्या प्रकरणातील आरोपी व बीड जिल्ह्यातील २३ वर्षीय पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणातील आरोपींवर अद्यापही कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीअंती त्यात काय आढळून आले आहे, तदनुसार उपरोक्त दोन्ही प्रकरणे ही गंभीर प्रकारच्या घटना असल्याने दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) व (२) श्रीमती दिपाली चव्हाण यांचे आत्महत्या प्रकरणी पोलीस स्टेशन धारणी, अमरावती येथे अप.क्र.२११/२०२१ कलम ३०६, ३१२, ५०४, ५०६ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरचा गुन्ह्याच्या तपासात गुन्हा लैंगिक छळाबाबत नसल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. उक्त प्रकरणी तत्कालिन उपवनसंरक्षक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. तसेच पर्यवेक्षकीय हलगर्जीपणाबाबत तत्कालिन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचीदेखील विभागीय चौकशी सुरु आहे.
बीड जिल्ह्यातील पुजा चव्हाण या त्यांच्या पुणे येथील रहाते घराच्या बाल्कनीतून खाली पडल्याने त्या जखमी होवून मयत झालेल्या आहेत. सदर प्रकरणी वानवडी पो.स्टे. येथे अकस्मात मृत्यु रजि.२१/२०२१ सी.आर.पी.सी, कलम १७४ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. सदरचे अकस्मात मृत्यु प्रकरण आत्महत्या अथवा अपघाती मृत्यु समरी करण्यात आले आहे.
तसेच उक्त प्रकरणी बीड जिल्ह्यात पो.स्टे.परळी शहर येथे गु.र.नं.१५३/२०२० कलम ३५४, ५०४, ५०६, भादंवि व गु.र.नं. १२७/२०२० कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि असे दोन गुन्हे दाखल असून सदर दोन्ही गुन्ह्याचा तपास करुन तपासात “ब” वर्गात अखेर अहवाल पाठविण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

रामटेक – पटगोवारी (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील पोलीसांनी मतदारास केलेली शिवीगाळ, व मारहाण

(३७) ३९३३८ (१२-०४-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक-पटगोवारी (ता.रामटेक, जि.नागपूर) येथे पंचायत समिती-२०२१ च्या पोट निवडणुकी दरम्यान पोलीस उपनिरीक्षक व पोलीस शिपाई मार्फत मतदारास शिवीगाळ व मारहाण करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मतदाराने पोलीस स्टेशन, रामटेक (जि.नागपूर) येथे तक्रार केल्यावर मतदाराच्या तक्रारीवर गुन्हा न नोंदविता मतदाराविरुध्दच भा.दं.वि. ३५३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात मतदारास विनाकारण मारहाण करण्यात आल्याने व या प्रकरणामुळे तेथील मतदान प्रक्रिया काही तासांकरिता बंद पडल्यामुळे अनेकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहिल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१), (२) व (३) पंचायत समिती-२०२१ च्या पोट निवडणुकी दरम्यान मौजे पटगोवारी गावातील जिल्हा परिषद शाळा येथील मतदान केंद्रावर कर्तव्यावर असलेल्या पोलीस नाईकांनी एका मतदार व्यक्तीस गाडी मतदान केंद्रापासून १०० मी. च्या बाहेर लावण्याबाबत सूचित केले. त्यावर सदर व्यक्तीने कर्तव्यावर असलेल्या पोलीस नाईक यांचा हात पिरगळला व इतर २ नातेवाईकांच्या मदतीने धमकावून शिवीगाळ केली.

नमुद घटनास्थळी पेट्रोलिंग अधिकारी पोलीस उप निरीक्षक आल्यानंतर कर्तव्यावर असलेल्या पोलीस नाईक यांनी वरिष्ठांना सर्व हकिकत सांगितली दरम्यान संबधित पोलीस नाईकाचा हात दुखवला गेल्याने उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय, रामटेक येथे नेण्यात आले. दरम्यान गावातील पोलीस पाटील यांचेकडून घटनेची सविस्तर माहिती घेऊन कर्तव्यावर असलेले पोलीस नाईक यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन रामटेक येथे संबंधित तीन व्यक्तींविरूध्द मतदाराविरुध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे गुरनं. ४३८/२०२१ भा.दं.वि. कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून संबंधित ३ आरोपी विरुध्द दोषारोप दाखल करण्यात आले आहे.

नमुद मतदान केंद्रावर कोणत्याही प्रकारची मतदान प्रक्रिया बंद पडली नाही. तसेच कोणालाही मतदानाच्या अधिकारापासून वंचित रहावे लागले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

चुडावा (जि.परभणी) पोलीस स्थानकाच्या हद्दीतून नांदेड जिल्ह्यात रेती व धान्याची अवैध मार्गाने वाहतूक होत असल्याबाबत

(३८) ३९४५१ (१२-०४-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चुडावा (जि.परभणी) पोलीस स्थानकाच्या हद्दीतून अवैध रेती तसेच स्वस्त धान्य दुकानातील मालाची अवैध मार्गाने नांदेड जिल्ह्यात वाहतूक करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) श्री.देवकाते हे संबंधितांकडून बेकायदेशीररित्या हफ्ते गोळा करून या अवैध वाहतुकीस साहाय्य करीत असून सदरहू प्रकरणी तातडीने कारवाई करण्यासंदर्भात श्री.शिवाजी शेरकर यांनी माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान पोलीस अधिक्षक, परभणी यांचेकडे तक्रार सादर केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान या अवैध वाहतुकीकरिता हफ्त्याची रक्कम स्वत:च्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने स्वीकारल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबतचे पुरावे श्री.शेरकर यांनी सादर करुनही अद्यापर्यंत संबंधितांवर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करुन तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी करुन त्यांचेवर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) : (१), (२), (३) व (४)

सदर प्रकरणी माहे जुन २०२० मध्ये परभणी जिल्ह्यातील चुडावा पोलीस स्टेशनचे तत्कालिन सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी देवकते हे बेकायदेशीररित्या हफ्ते गोळा करुन अवैध वाहतुकीस सहाय्य करीत असल्याने त्यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबतचे निवेदन श्री. शिवाजी शेरकर यांनी पोलीस अधीक्षक, परभणी यांचेकडे सादर केले आहे. या प्रकरणी तत्कालिन पोलीस उप विभागीय अधिकारी, पुर्णा व सहाय्यक पोलीस अधीक्षक, परभणी यांचे मार्फतीने चौकशी करण्यात आली. सदर चौकशी अहवालावरुन सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. देवकते यांनी गंभीर स्वरुपाची कसुरी केल्याचे निदर्शनास आल्याने सहायक पोलीस निरीक्षक / शिवाजी माधवराव देवकते यांचेविरुध्द प्राथमिक चौकशी अंती पोलीस अधीक्षक, परभणी यांनी दिनांक १५/०६/२०२२ रोजीच्या अंतिम आदेशान्वये " पुढील वार्षिक वेतनवाढ तीन (३) वर्षाकरीता स्थगित करणे" शिक्षा दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

(३९) ३९४८२ (१२-०४-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून या घटनांचा छडा लावून आरोपींना अटक करण्याबाबत तसेच इतर मागण्यांसाठी व्यापारी महासंघाने बंद पुकारला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बंदला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाल्याने शहरातील व्यापारी प्रतिष्ठाण बंद होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चोरीच्या घटनांना पोलीसांना अपयश येत असल्याने व्यापारीसह नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी होत असलेल्या चोरीच्या घटनेस आळा घालण्याबाबतची मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) :(१) व (२) होय हे खरे आहे.
(३) याबाबत व्यापारी महासंघ हिंगोली यांच्याकडून पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना चोरीच्या घटनांना आळा घालण्याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे.
(४) हिंगोली शहरात सन २०२१ ते १५.०२.२०२२ पर्यंत जबरी चोरीचे ०६ गुन्हे दाखल असून त्यापैकी ०३ गुन्हे उघड झाले व ०७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तसेच सदर कालावधीत घरफोडीचे १२ गुन्हे दाखल असून ०३ गुन्हे उघड झाले व ०३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तर चोरीच्या एकूण ५६ दाखल गुन्ह्यापैकी ३४ गुन्हे उघड झाले असून ६४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक, हिंगोली यांच्याकडून विशेष पथक स्थापन करुन हिंगोली शहरात वाढत्या गुन्ह्यांना आळा घालण्याकरीता विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.
(५) विलंब झालेला नाही.

साक्री (जि.धुळे) तालुक्यातील निम्प पांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(४०) ३९५३० (११-०४-२०२२). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील निम्प पांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्प जलसंपदा विभागाने ६०० कोटी रुपये खर्च करून सन २०१८ मध्ये त्याचे पूर्ण झालेले काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने प्रकल्पात केवळ ६० टक्के पाणी साठा राहून बाकीचे पाणी वाया जात आहे, अशा तक्रारी शेतकरी व ग्रामस्थांकडून जलसंपदा विभागाकडे माहे २०१८ सातत्याने करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पात १०० टक्के पाणीसाठा झाल्यास बुडीत क्षेत्रही वाढणार असल्याने त्यासाठी शेत जमिनी संपादीत कराव्या लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी नव्याने बुडीत क्षेत्रात येणाऱ्या शेतजमीनी योग्य मोबदला देऊन अधिग्रहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची पहाणी केली आहे काय, तद्अनुषंगाने तालुक्यातील अवर्शष प्रवण क्षेत्रातील शेतकऱ्यांना उपसा सिंचनव्दारे पाणी तसेच ३०-३५ गावांना पिण्याच्या पाण्याचा लाभ मिळण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे अंशःत खरे आहे. निम्न पांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्पावर जानेवारी २०२२ अखेर रु.५३६.७४ कोटी खर्च झाला आहे. मुख्य धरणाचे बांधकाम पूर्ण होऊन सन २०१८-१९ पासून साधारणता ६०% पाणीसाठा करण्यात येत आहे. धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत कोणतीही तक्रार क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त नाही.

(२) होय हे खरे आहे. प्रकल्पात पूर्ण क्षमतेने (१०९.३१४ दलघमी) पाणीसाठा करण्यासाठी अंदाजे १९८ हेक्टर्स इतकी अतिरिक्त जमीन संपादित करावी लागणार आहे.

(३) नाही. सद्यस्थितीत जमीन संपादनाची बाब विचाराधीन नाही.

(४) क्षेत्रीय स्तरावरून सदर प्रकरणाची पाहणी करण्यात आली आहे. मंजूर प्रकल्प अहवालानुसार सिंचनासाठी ४४.३५९ दलघमी व बिगर सिंचनासाठी धुळे म.न.पा. करिता ७.९९ दलघमी, धुळे MIDC साठी ८.५० दलघमी व डावा कालव्या द्वारे पिण्यासाठी २.९७ दलघमी आणि बाष्पीभवन तूट १३.१६ दलघमी असा एकूण वार्षिक पाणीवापर ७६.९७९ दलघमी आहे. वरील प्रमाणे मंजूर प्रकल्पीय पाणी वापरात उपसा सिंचन योजनांचा समावेश नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महारेरा प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेल्या विकासकाकडून काम काढून ते म्हाडातर्फे पूर्ण करण्याबाबत

(४१) ३९६४२ (१०-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात करोना महामारीच्या संकटकाळात महारेरा प्राधिकरणाने ठराविक कालमर्यादेत काम पूर्ण न केल्याने करोनाच्या पहिल्या लाटेत सन २०२० मध्ये रखडलेल्या सुमारे १ हजार ६४ प्रकल्पांना तर दुसऱ्या लाटेत सन २०२१ मध्ये ४८३ प्रकल्पांना काळ्या यादीत टाकण्यात आल्याची बाब दिनांक ५ डिसेंबर, २०२२ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महारेराने उक्त गृहप्रकल्पांना कोणत्या निकषाच्या आधारे त्यांची नावे काळ्या यादीत समाविष्ट केली आहेत,

(३) असल्यास, माहे फेब्रुवारी २०२२ पर्यंत किती गृहप्रकल्पांच्या विकासकांनी मुदत वाढवून निश्चित वेळेत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे प्राधिकरणास लेखी स्वरुपात आश्वासन दिले आहे,
(४) असल्यास, हेतुपुरस्सर गृहप्रकल्पाचे काम प्रलंबित ठेवणाऱ्या विकासकाकडून काढून ते काम शासन तथा म्हाडातर्फे पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, विकासकाकडून काढून घेतलेल्यां गृहप्रकल्पांची एकूण संख्या किती आहे?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) : (१) व (२) स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार ज्या प्रकल्पाची मुदत पूर्ण करण्याचा कालावधी संपूष्टात आलेला आहे, अशा प्रकल्पांची यादी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर दि.०७.१२.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.ज्यामध्ये ३२७० प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे.
(३) माहे फेब्रुवारी २०२२ पर्यंत १०८० प्रकल्पांना मुदतवाढ देण्यात आली आहे.
(४) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे अर्धन्यायिक स्वरुपाचे काम पार पाडले जाते. सदर प्रकल्प पुर्ण करण्याच्या अनुषगांने स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार ज्या प्रकल्पातील ग्राहक संयुक्तपणे कलम ७ अन्वये तक्रार दाखल करतात अशा प्रकल्पातील ग्राहकांची, विकासकाची संयुक्तपणे सुनावणी घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येते.

नंदुरबार जिल्ह्यातील मध्यम व लघुपाटबंधारे योजनांच्या सिंचनाची व्यवस्था पाईपलाईनव्दारे करणे बाबत.

(४२) ३९७६२ (०१-०४-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी भागातील मध्यम व लघुपाटबंधारे योजनांच्या सिंचनाची व्यवस्था पाईपलाईनव्दारे करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयातील कोण-कोणत्या मध्यम व लघुपाटबंधारे प्रकल्पांमध्ये सदर योजना राबविली जाणार असून सदरहू कामासाठी साधारणत: किती खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास, सदरहू ठिकाणी पाईपलाईनव्दारे मध्यम व लघुपाटबंधारे योजनेची वितरण व्यवस्था केल्यास उक्त जिल्ह्यातील अंदाजे किती हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुषंगाने उक्त जिल्ह्यातील मध्यम व लघुपाटबंधारे योजनेची वितरण व्यवस्था पाईपलाईनद्वारे करण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) :१) होय. शासन निर्णय क्र. सिंचन २०१५/प्र.क्र. २४/२०१५/जसं (धोरण) दि. ०९.०६.२०१६ अन्वये शासनामार्फत नलिकेद्वारे सिंचन वितरणाचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.
(२)

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	पाईपलाईन द्वारे सिंचनाचा अंदाजित खर्च (रु.कोटी)
१	देहली मध्यम प्रकल्प ता.अक्कलकुवा	७.६१
२	नागन मध्यम प्रकल्प ता. नवापूर	२७.७४
३	शिवण मध्यम प्रकल्प ता.नंदुरबार	१३.८६
४	दरा मध्यम प्रकल्प ता.शहादा	३६.५५
५	प्रकाशा बुराई उ.सिं.यो. अंतर्गत निंभेल साठवण तलाव	८.१९

६	प्रकाशा बुराई उ.सिं.यो. अंतर्गत आसाणे साठवण तलाव	१५.९१
७	बिलाडी ल.पा.यो. ता.नंदुरबार	७.६
८	इच्छागव्हाण ल.पा.यो.ता.तळोदा	५.८४
९	बर्डिपाडा ल.पा.यो. ता.नवापूर	६.२
१०	भुरीवेल ल.पा.यो. ता.नवापूर	७.८९
११	हरिमहू ल.पा.यो. ता.नवापूर	४.४
१२	पानबारा ल.पा.यो.ल.पा.यो.	६.३७
१३	धनपूर ल.पा.यो. ता.तळोदा	२.७
१४	रापापूरल.पा.यो.ता.तळोदा	७.३३
१५	रामपूर ल.पा.यो. ता.अक्कलकुवा	४.५
	एकूण	१६२.६९

(३) नंदुरबार जिल्ह्यातील मध्यम व लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत बंदिस्त नलिका वितरण प्रणालीद्वारे (पाईपलाईनद्वारे) प्रस्तावित सिंचन क्षेत्र एकूण १३४०६ हेक्टर आहे.
(४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. उपरोक्त नमूद प्रकल्पांपैकी इच्छागव्हाण ल.पा.यो. ता.तळोदा व रामपूर ल.पा.यो. ता.अक्कलकुवा प्रकल्पास प्राप्त सुधारीत प्रशासकिय मान्यता अहवालामध्ये बंदिस्त पाईपलाईनद्वारे सिंचनाचा समावेश करण्यात आलेला आहे. उर्वरित प्रकल्पांना सुधारीत प्रशासकिय मान्यता देणेबाबत शासन स्तरावर तसेच क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अचकनहळी(ता.जत,जि.सांगली) येथील कंत्राटी वायरमनचा विजेचा धक्का लागून झालेला मृत्यु

(४३) ३९८२२ (०९-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचकनहळी(ता.जत,जि.सांगली) येथील एका ३५ वर्षीय कंत्राटी वायरमन लक्ष्मण तुकाराम कोळी हे जतकडे जाणा-या रोडवरील टी.सी जवळील विजेच्या खांबावर चढून काम करीत असतांना अचानक विज पुरवठा सुरु झाल्याने विजेच्या झटक्याने खांब्यावरुन खाली पडून जागीच मृत्यु झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मृत वायरमन यांच्या कुटूंबियांना आवश्यक मदत करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) मृत कंत्राटी कर्मचारी कै. श्री. कोळी यांच्या कुटूंबियांना कंत्राटदार मे. साई केदार सर्व्हिसेस, सावर्डे यांच्याकडून तातडीची मदत रु. २०,०००/- (रु. वीस हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. तसेच कामगार राज्य विमा योजना (ESIC) कार्यालयाकडून तातडीची मदत रु. १५,०००/- वारसांना दिलेली आहे. तसेच कामगार राज्य विमा योजना (ESIC) कार्यालयाकडून कै. कोळी यांच्या वारसांचा अवलंबित मदत (Dependent Benefit) दावा दाखल करुन घेतलेला असून वारसदारांना काही कागदपत्रे सादर करण्याबाबत कामगार राज्य विमा योजना (ESIC) कार्यालयाकडून कळविण्यात आले. वारसदारांने कामगार राज्य विमा योजना (ESIC) कार्यालयाकडून मागीतलेल्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर मयत कामगारांच्या वारसांना अवलंबित मदत (Dependent Benefit) लागू करण्यात येईल. तसेच भविष्य निर्वाह निधीबाबत मे. साई केदार सर्विसेस सावर्डे यांनी कार्यवाही केली असून त्याचा पाठपुरावा एजन्सीमार्फत चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खानापूर, आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील येथील शेतक-यांना कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची वीज जोडणी बंद केल्याबाबत

(४४) ३९८३३ (०९-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर, आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील येथील अनेक शेतक-यांची वीज देयके थकीत असल्याने शेतक-यांना कोणतीही पूर्वसूचना न देता महावितरणाच्या कर्मचा-यांनी ट्रान्सफार्मवरील वीज जोडणी दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास बंद केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना कोणतीही पूर्वसूचना न देता वीज पुरवठा बंद करण्याची कारणे काय आहे,

(३) असल्यास, शेतक-यांचे वीज जोडणी पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२२) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) कृषी ग्राहकांना त्यांचा वापरात असलेला मोबाईल नंबर महावितरणच्या कार्यालयास नोंदविण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयाकडून विनंती केली जाते. महावितरणच्या संगणकीय प्रणालीद्वारे ज्या कृषी ग्राहकांनी चालू देयकाचा भरणा केलेला नाही अशा कृषी ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वीजपुरवठा खंडीत करण्याच्या नोटीस दिल्या जातात. काही कृषीपंप ग्राहकांना एसएमएसद्वारे सुचना मिळाली नसल्याचे निदर्शनास आल्याने त्यांच्या कृषीपंपाचा तात्पूरता खंडीत केलेला वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला.

(३) एसएमएसद्वारे वीज पुरवठा खंडीत करण्याची सूचना मिळाली नसलेल्या कृषी ग्राहकांच्या कृषी पंपाचा तात्पुरता खंडीत केलेला वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वीज कंपन्याकडून घेतलेले वीजेचे दर जास्त असल्याबाबत

(४५) ३९८६६ (१९-०४-२०२२). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन ज्या वीज कंपनीकडून वीज विकत घेते त्या विजेचे दर इतर राज्यापेक्षा सर्वाधिक आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे जास्तीचे दर कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीमार्फत खरेदी करण्यात येत असलेले ट्रान्सफॉर्मर निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(४६) ३९८६७ (०१-०४-२०२२). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीमार्फत खरेदी करण्यात येत असलेले ट्रान्सफॉर्मर निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे राज्यात अनेक वेळा ट्रान्सफार्मर जळण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
महावितरणमार्फत खरेदी करण्यात येणारे रोहित्रे भारतीय मानक ब्युरो (BIS) आणि ऊर्जा दक्षता ब्युरो (BEE) संस्थांनी ठरवून दिलेल्या मानाकंनानुसारच खरेदी केले जातात.
(२) विविध कारणांमुळे जसे की, रोहित्राचे कार्यकाळ, नैसर्गिक आपत्ती, अतिभार किंवा असंतुलित भार झाल्यामुळे रोहित्रे नादुरुस्त होतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जत व संख (जि. सांगली) तालुक्यातील साठवण तलांवातील गाळ काढण्याबाबत.

(४७) ३९९०४ (११-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत व संख (जि.सांगली) येथील पाटबंधारे शाखा कार्यालयातर्फे साठवण तलावातील गाळ काढण्याचे प्रस्ताव वेळेत सादर न केल्याने मागील वर्षी पावसाळा आला तरी येथील साठवण तलावातील गाळ काढण्यात आलेला नसल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ठिकाणी अपेक्षित पाणीसाठा होवू शकला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जत तालुक्याच्या उत्तर सिमेलगत सांगोला भागातील पाणीटंचाई लक्षात घेता येथे म्हैसाळ उपसा योजनेच्या बंदिस्त पाणी योजनेचे काम तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू कामात हजगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०२२) : (१) हे खरे नाही.
जत व संख (जि. सांगली) येथील पाटबंधारे शाखा कार्यालयातर्फे साठवण तलावातील गाळ काढण्याचा कोणताही प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही.परंतु संख मध्यम प्रकल्पातील गाळ व गाळमिश्रीत वाळू निष्कासनाचा प्रस्ताव प्राप्त असून, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) म्हैसाळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत सांगोला तालुक्यातील गावांना सिंचन करणा-या वितरकांची कामे पूर्ण झाली असून आवर्तना दरम्यान सदर भागांना पाणी देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महावितरणाकडून देण्यात येणाऱ्या नवीन वीजजोडणी प्रक्रियेबाबत

(४८) ३९९२० (०९-०४-२०२२). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरणकडून नवीन वीजजोडणी देण्यासंदर्भात काढलेल्या परिपत्रकामुळे (परिपत्रक क्रमांक ६६६०) सोय होण्याऐवजी नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन वीजजोड देताना त्या परिसरातील ट्रान्सफॉर्मवरील एनर्जी ऑडीट मीटरमध्ये नोंद झालेला पिक लोड (आजपर्यंत त्या ट्रान्सफॉर्मवर जास्तीत जास्त वापर झालेला विजभार) आणि त्याच ट्रान्सफॉर्मवरील महावितरणच्या आयटी विभागात नोंद झालेला एकूण वीजभार विचारात घेतला जात आहे, ही ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महावितरणकडून सोयीनुसारच आणि ठराविकच नवीन वीजजोडणी अर्ज मंजूर केले जात असल्यामुळे नवीन वीजजोडणी अर्ज मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पूर्वीप्रमाणेच नवीन वीजजोड प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
नवीन वीज जोडणी देताना त्या परिसरातील रोहित्रावरील व वीज वाहिनीवरील अस्तित्वात असलेला महत्तम दाब तसेच आयटी विभागाकडून प्राप्त अहवाल विचारात घेऊन व तांत्रिकदृष्ट्या सक्षमता तपासून नवीन वीज जोडणी देण्यात येते.
(३) हे खरे नाही. महावितरणकडे नवीन वीज जोडणी अर्ज मोठया प्रमाणात प्रलंबित नाहीत. आर्थिक वर्ष २०२१-२२ (जानेवारी-२०२२) मध्ये एकूण ९,८०,४६२ इतके नवीन वीज जोडणी अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ८,४७,७५० ग्राहकांना नवीन वीज जोडणी देण्यात आली व जानेवारी, २०२२ अखेर १,३२,७१२ इतके नवीन वीज जोडणी अर्ज प्रक्रियेधीन आहेत. महावितरण कडून अंदाजे १०,००,००० ग्राहकांना दरवर्षी महावितरणच्या प्रचलित नियमावलीनुसार नवीन वीज जोडणी देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

थिलोरी (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील अवैध दारुविक्रेत्यांनी पोलीसांवर केलेला हल्ला

(४९) ३९९९४ (०७-०४-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) थिलोरी (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील अवैध दारु विक्रेत्यांनी दारुच्या बाटलीनेच पोलीसांवर हल्ला करुन सहायक पोलीस निरिक्षक व तीन कर्मचाऱ्यांना जखमी केल्याची घटना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेनंतर जखमी झालेल्या पोलीसांना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली वा करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, याप्रकरणी पोलीसांवर हल्ला करणाऱ्या आरोपींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) : (१) होय.
(२) सदर घटनेत जखमी झालेल्या पोलीसांना तात्काळ वैद्यकीय सेवा पुरविण्यात आली व वैद्यकीय उपचार करण्यात आले. पोलीसांवर हल्ले करणाऱ्या आरोपींवर पोलीस स्टेशन, दर्यापूर जि. अमरावती येथे अप.क्र.१०७/२०२२ कलम ३०७, ३५३, ३३२, ३३३, ३३६, १८६, ३४ भा.दं.वि. सहकलम ६५ (ड) (ई) मुदाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात ४ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा तपास पूर्ण झाला असून आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जत-वळसंग (ता.जत, जि.सांगली) येथे अज्ञात इसमाने पवनचक्कीला आग लावल्याबाबत

(५०) ४००३९ (०७-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत-वळसंग (ता.जत, जि.सांगली) येथील रस्त्यावरील आयनॉक्स विंड कंपनीच्या पवनचक्कीच्या यंत्रणांना (मशीन) अज्ञात इसमाने दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास आग लावल्याने पवनचक्कीचे कोट्यवधीचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) : (१) , (२) व (३) होय हे खरे आहे.

जत वळसंग, ता.जत, सांगली येथील मार्गावरील आयनॉक्स विंड कंपनीची पवनचक्की एका अज्ञात इसमाने पेटवून देऊन नुकसान केले आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन जत येथे गु.र.नं. ४९२/२०२१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तथापि, सदर गुन्ह्यातील आरोपी बाबत माहिती मिळाली नसल्याने सदर गुन्हा हा कायमस्वरुपी तपासावर ठेवण्याकरीता मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत यांच्याकडे “अ” अंतिम समरी नं.५१/२०२२ अन्वये अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली व पोलीस ठाणे, जत यांच्या स्तरावरुन सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

विधान भवन : **राजेन्द्र भागवत**
नागपूर. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.